प्रसन्न यशवंत कोतुळकर
मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा
शिक्षकेतर संघटनांचे महामंडळ,
दिनांक : २४/१०/२०२३

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळ
द्वारा – रावसाहेब पटवर्धन विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, साने गुरुजी स्मारक, पर्वती पायथा, पुणे – ४११०३०
नोंदणी क्र. बी वाय टू / ८२८१ दि. २१/१०/१९८६

सस्नेह नमस्कार,

सर्वप्रथम आपणा सर्वांना विजयादशमी – दसऱ्याच्या मन:पूर्वक शुभेच्छा ..........

१७ सप्टेंबर २०२३ रोजी सोलापूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर महामंडळाच्या कार्यकारिणीत आमची निवडणूक अधिकारी म्हणून निवड करण्यात आलेली आहे. आपण सर्वांनी अतिशय विश्वासाने आमच्यावर निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी सोपवली याबद्दल आम्ही राज्य शिक्षकेतर महामंडळ पदाधिकारी व आपणा सर्वांचे अतिशय आभारी आहोत. सदर दिनांक १७ सप्टेंबर २०२३ च्या कार्यकारिणीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार राज्य शिक्षकेतर महामंडळाचे सरकार्यवाह श्री. शिवाजीराव खांडेकर यांनी महामंडळाच्या २०२३ ते २०२६ च्या त्रैवार्षिक निवडणुकीसाठी शनिवार दि. २१/१०/२०२३ रोजी मतदार यादी निवडणूक समितीस सादर केलेली आहे. यासंदर्भात सर्व निवडणूक समिती सदस्यांची एकत्रित बैठक झाली. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर महामंडळाचे सरकार्यवाह यांच्याकडून प्राप्त झालेल्या सर्व मतदार याद्या टाईप करून फोटोसहित प्रसिध्द करण्याच्या दृष्टीकोणातून काम पूर्ण करण्यात आले आहे. **<u>निवडणूक समितीच्या सर्व सदस्यांनी एकमताने रविवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळाची सन २०२३ ते २०२६ ची त्रैवार्षिक निवडणूक रावसाहेब पटवर्धन विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, दांडेकर पुलाजवळ, साने गुरुजी स्मारक, पर्वती पायथा, पुणे – ४११०३० येथे घेण्याचे ठरले आहे.</u>** या निवडणुकीबाबत खालीलप्रमाणे निवडणूक कार्यक्रम आम्ही जाहीर करत आहोत.

राज्य शिक्षकेतर महामंडळाकडून आलेल्या यादीनुसार ३३ जिल्ह्यांचा या निवडणुकीत सहभाग आहे. प्रत्येक जिल्ह्याचे अध्यक्ष, कार्यवाह, सेवक प्रतिनिधी आणि पाच सदस्य असे आठ सदस्य व महामंडळाचे सर्व विद्यमान पदाधिकारी मतदार म्हणून या निवडणुकीस पात्र आहेत. रविवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२३ रोजी होणाऱ्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळाची सन २०२३ ते २०२६ ची त्रैवार्षिक निवडणूकीची मतदार यादी आज दिनांक २४/१०/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे. संबधित यादी सर्वच मतदारांना पोस्टाने पाठवणे खर्चिक व वेळखाऊ असल्याने तसेच आजच्या संगणकीय दृष्टीकोनातून निवडणूक समितीने सदर जिल्हानिहाय मतदार यादी मतदारांच्या नाव व फोटोसहित आपल्या सर्वांच्या माहितीसाठी पुणे माध्यमिक शाळा शिक्षकेतर सहकारी पतपेढीच्या www.punentp.co.in या वेबसाईटवर आज दिनांक २४/१०/२०२३ रोजी प्रसिध्द करीत आहोत. आपण सर्वांनी www.punentp.co.in या वेबसाईट वरून डाऊनलोड करून घ्यावी. सर्व जिल्हा अध्यक्ष यांनी याबाबतची माहिती आपल्या सर्व सदस्यांना द्यावी. विद्यमान विभागीय उपकार्यवाह यांनी देखील आपल्या विभागातील सर्व जिल्हा अध्यक्षांना या बाबत सूचना / माहिती द्यावी व महामंडळ निवडणूक समितीस सहकार्य करावे.

<u>निवडणूक तपशील</u>

| अ.क्र. | पद | संख्या | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | १ (एक) | कोणीही शिक्षकेतर तसेच शिक्षकेतराव्यतिरिक्तही |
| २ | उपाध्यक्ष | ५ (पाच) | १ कोणीही शिक्षकेतर सेवक<br>२ चतुर्थश्रेणी कर्मचारी<br>२ कोणीही महिला शिक्षकेतर<br>(महिला सदस्य उपस्थित नसल्यास ते पद रिक्त ठेवण्यात येईल) |
| ३ | कार्याध्यक्ष | १ (एक) | शिक्षकेतर सेवक |
| ४ | सरकार्यवाह | १ (एक) | शिक्षकेतर सेवक |
| ५ | उपकार्यवाह | ८ (आठ) | शिक्षकेतर सेवक (८ शिक्षण विभागासाठी प्रत्येकी १) |
| ६ | प्रसिद्धी प्रमुख | १ (एक) | शिक्षकेतर सेवक |
| ७ | अंतर्गत हिशोब तपासनीस | १ (एक) | शिक्षकेतर सेवक (महामंडळ कार्यकारिणीचा सदस्य नसावा) |

Scanned with CamScanner

## निवडणुकीसाठी सूचना

१. सर्वसाधारण सभेचे सदस्य निवडणूकीस उमेदवार राहतील. हा नियम अध्यक्ष पदासाठी असणार नाही.
२. एक व्यक्ती एकाच पदासाठी उमेदवार राहील.
३. एका व्यक्तीने अनेक पदासाठी अर्ज भरल्यास माघारीच्या मुदतीपर्यंत आपल्या एकाच पदाकरिता नामनिर्देशन पत्र ठेवून त्या व्यक्तीस अन्य पदाचे नामनिर्देशन पत्र माघारी घेणे आवश्यक आहे. असे न केल्यास अर्ज माघारी घेण्याची मुदत संपल्यावर त्या उमेदवाराचे सर्व अर्ज नामंजूर होतील.
४. एका पदाकरिता एकापेक्षा जास्त उमेदवार अर्ज असल्यास गुप्त पद्धतीने मतदान घेण्यात येईल.
५. प्रत्येक मतदारास निवडणूक अधिकाऱ्याच्या सहीने व महामंडळाच्या शिक्क्यासह मतपत्रिका दिली जाईल. ज्या उमेदवारास मत द्यावयाचे आहे त्याच्या नावाच्या पुढील चौकोनात फुलीचा (X) शिक्का मारावा.
६. त्रैवार्षिक निवडणुक सन २०२३ ते २०२६ साठी उमेदवारी अर्जाची किंमत प्रत्येकी रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त) ठेवण्यात आली असून सदर रक्कम रोख भरून उमेदवारी अर्ज दिला जाईल.
७. रविवार दिनांक २६/११/२०२३ रोजी अंदाजे दुपारी १२ पासून निवडणूक प्रक्रिया सुरु होईल.
८. निवडणूकी संदर्भात निवडणूक अधिकारी यांचे निर्णय अंतिम राहतील व ते सर्वांनाच बंधनकारक असतील .

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळ हे राज्यातील सर्वच शिक्षकेतरांच्या हिताचे कार्य करणारे महामंडळ आहे. त्यास खूप चांगला इतिहास आहे. त्यामुळे आपण सर्वांनी अत्यंत खुल्या व खेळीमेळीच्या वातावरणात या प्रक्रियेत सहभागी व्हावे. या सर्व प्रक्रियेमध्ये आपणा सर्वांचे उत्तम सहकार्य आम्हा सर्व निवडणूक समितीस मिळेल याची आम्हास खात्री आहे.

कळावे,

दिनांक : २४/१०/२०२३

आपला विश्वासू

स्थळ : पुणे

(प्रसन्न यशवंत कोतूळकर)
मुख्य निवडणूक अधिकारी

**निवडणूक समितीचे सन्मानीय सदस्य**

१. श्री. रमेश इंगवले – सातारा जिल्हा
२. श्री. देवेंद्र पारखे – पुणे जिल्हा
३ श्री.रामगोंडा खोत – सांगली जिल्हा
४. श्री. निलेश पारकर – सिंधुदुर्ग जिल्हा

**निवडणूक समिती कार्यालयीन पत्ता :**

निवडणूक निर्णय अधिकारी,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळाची
सन २०२३ ते २०२६ ची त्रैवार्षिक निवडणूक,
द्वारा-पुणे माध्यमिक शाळा शिक्षकेतर पतपेढी, १३२९ सदाशिव पेठ, पुणे– ४११ ०३०.

Scanned with CamScan